मायणी तलाव व त्या परिसरातील गांवे व माण पुर्व भागातील १६ गावांना पिण्यासाठी व पशुधनासाठी कृष्णा नदीमधुन टेंभू उपसा सिंचन योजनेतून पाणी उपलब्ध करून देणेबाबत योजनांच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय- २०१८/ प्र.क्र.३/म-७

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- १० जूलै, २०१९.

संदर्भः- १) शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय- २०१८/ प्र.क्र.३/म-७, दिनांक :- १७ जानेवारी, २०१८ व शुध्दीपत्रक दिनांक १६ मार्च २०१८.

२) जिल्हाधिकारी सातारा यांचे पत्र क्र. पाणीटंचाई/कावि-१०३६/१८, दिनांक-१०/१२/२०१८.

३) जिल्हाधिकारी सातारा यांचे पत्र क्र. पाणीटंचाई/कावि-७१/१९, दिनांक :- १६ जानेवारी, २०१९

४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन निर्णय क्रमांक टंचाई :- २०१७/प्र.क्र.१२७/ पापु १४, दिनांक २७ मार्च २०१८.

प्रस्तावना :-

मायणी तलाव व परिसरातील गांवे व माण पुर्व भागातील प्रस्तावित १६ गावांना पिण्यासाठी व पशुधनासाठी कृष्णा नदीमधुन टेंभु उपसा सिंचन योजनेतुन पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मायणी तलाव भरणेसाठी रू. ४७२.८९ लक्ष व माण तालुक्याच्या पुर्व भागातील प्रस्तावित १६ गावांसाठी रू. ४३२.३२ लक्ष रकमेची कामे प्रगतीपथावर असून झालेल्या कामाची देयके अदा करण्यासाठी तसेच कामाची गती राखण्यासाठी जिल्हाधिकारी सातारा यांनी शासनास संदर्भाधीन पत्रान्वये निधी उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २०१८ नुसार खटाव तालुक्यासाठी ४७२.८९ लक्ष व माण तालुक्यासाठी ४३२.३२ लक्ष असा एकूण रू.९०५.२१ लक्ष इतका निधी मदत व पुनर्वसन विभागाकडून टंचाई निधीतून विशेष बाब म्हणून देण्याबाबत मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) व मा. मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली होती. त्यानुसार दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयानुसार योजना कार्यान्वित करण्यासाठी खटाव तालुक्यासाठी रु.४७२.८९ लक्ष व माण तालुक्यासाठी रु.४३२.३२ लक्ष इतका निधी दोन हप्त्यामध्ये (पहीला हप्ता ५०%, दुसरा हप्ता ५०%) उपलब्ध करून देण्यात येईल असे नमुद केले आहे. सद्यस्थितीत उपरोक्त दोनही योजनांची कामे ७५ टक्के पुर्ण झाल्यामुळे माण व खटाव तालुक्यासाठी मंजूर निधीच्या ७५ टक्के निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उपरोक्त पार्श्वभूमीवर खटाव तालुक्यातील मायणी तलाव व परिसरातील गांवे व माण पुर्व भागातील १६ गावांना पिण्यासाठी व पशुधनासाठी कृष्णा नदीमधुन टेंभु उपसा सिंचन योजनेतुन पाणी उपलब्ध करून देण्यासाठी राबवावयाच्या योजनेच्या अंदाजपत्रकानुसार खटाव तालुक्यासाठी रु.४७२.८९ लक्ष व माण तालुक्यासाठी रु.४३२.३२ लक्ष इतक्या खर्चाची योजना राबविण्यासाठी सदर्भाधीन क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२. प्रशासकीय मान्यतेनुसार सुरु करण्यात आलेल्या योजनांवरील कामाच्या देयकांची अदायगी करण्यासाठी माण तालुक्याच्या योजनेसाठी तांत्रिक मान्यता देण्यात आलेल्या रु.४१७.३६ लक्ष निधीच्या ७५ टक्के म्हणजे रु.३१३.०२ लक्ष तसेच खटाव तालुक्यासाठी तांत्रिक मान्यता देण्यात आलेल्या रु.४७०.६२ लक्ष निधीच्या ७५ टक्के म्हणजे रु.३५२.९७ लक्ष असा एकुण रु.६६५.९९ लक्ष इतका निधी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास उपलब्ध करुन देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. या आदेशाप्रमाणे देण्यात येत असलेल्या निधीचे पूर्ण विनियोजन झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच व योजनेचे काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर उर्वरित २५ टक्के निधी वितरीत करण्यात येईल.

४. या प्रयोजनार्थ होणारा खर्च २२४५ या लेखाशिर्षाखाली १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च (९२) (०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (अनिवार्य) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (२२४५२१८५) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७१०१५१९५३३६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.07.10 15:29:10 +05'30'

(सुभाष उमराणीकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.
२. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. विभागीय आयुक्त, पुणे
४. जिल्हाधिकारी, सातारा
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा
६. अधिक्षक अभियंता सांगली पाटबंधारे विभाग, सांगली.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली
८. महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य,मुंबई/ नागपूर
९. महालेखापाल १/२, (लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य,मुंबई/ नागपूर

१०.संचालक लेखा व कोषागारे, मुंबई
११.वित्तीय सल्लागार व सह सचिव, मदत व पुनर्वसन, नवीन प्रशासन भवन,मुंबई यांना सदर निधी
१२.बीम्स प्रणालीवर वितरीत करण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
१३.कक्ष अधिकारी (म-११) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.निवडनस्ती, कायार्सन म-७